# मराठी
# शुद्ध लेखनाचे निवडक नियम.

हें पुस्तक

विनायक दत्तात्रय भिलवडीकर
एडिटर 'शिक्षक' व चिकोडी प्रा०
इं० स्कूलचे सुपरिंटेंडेंट
यांनीं तयार केलें,

तें
रामचंद्र चिंतामण भागवत
बुकसेलर कोल्हापूर
यांणी
चिकोडीः 'ज्ञानप्रसारक' छापखान्यांत
छापून प्रसिद्ध केलें.

१८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदवून
सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपल्या
स्वाधीन ठेविले आहेत.

आ० २ री] किंमत १ आणा. [प्रती २०००

मराठी

# शुद्ध लेखनाचे निवडक नियम.

## भाग १ ला.

### व्याकरण.

१ ज्यापासून कांहीं अर्थ निष्पन्न होतो, असा जो एकाक्षरी किंवा अनेकाक्षरी उच्चार त्यास **शब्द** ह्मणावें. जसें—कावळा, मी, कां, शाबास इ०

२ **भाषा** ह्मणजे परस्परांचे मनोभाव परस्परांस कळावे ह्मणून जो सार्थ शब्दसमूह आपण मुखानें उच्चारितों किंवा हातानें लिहितों तो.

३ शब्दाच्या जाति आठ. १ **नाम**. २ **सर्वनाम**. ३ **विशेषण**. ४ **क्रियापद**. ५ **क्रियाविशेषण**. ६ **उभयान्वयी अव्यय**. ७ **शब्दयोगी अव्यय**. ८ **उद्गारवाचक अव्यय**.

४ **नाम** ह्मणजे प्रत्येक पदार्थाचें नांव. मग तो पदार्थ प्रत्यक्ष दिसो, अगर त्याचा अंतःकरणास नुसता भास होवो. जसें—झाड, दऊत, मन, हवा, गोडी इ०

नामाचे सामान्य, **विशेष** व **भाववाचक** असे तीन भेद आहेत.

५ **सामान्य** नाम ह्मणजे जातिवाचक शब्द. ह्मणजे पदार्थांची कोणतीही जात घेतली कीं तींत तसल्या

जातीच्या प्रत्येक पदार्थांचा समावेश झाला पाहिजे. जसें—झाड, नारळ, नदी इ०

६ ठेवलेलीं जीं मनुष्यादिकांचीं नांवें तीं सारीं **विशेष** नामें होत. जसें—काशी, विष्णु, कृष्णा, व्यंकु इ०

७ पदार्थांचा भाव अथवा धर्म ज्या नामांच्या योगानें ओळखतां येतो, तीं **भाववाचक** नामें होत. जसें—मनुष्यत्व, लघुता, भोळेपणा इ०

८ **सर्वनाम** ह्मणजे नामाचा उच्चार वारंवार होऊं नये, ह्मणून त्या नामाबद्दल जो दुसरा एक शब्द घालितात तो. जसें—मी, हा, जो, ती इ०

सर्वनामाचे भेद पांच. १ **पुरुषवाचक** २ **दर्शक** ३ **संबंधी** ४ **प्रश्नार्थक** ५ **सामान्य.**

( १ ) पुरुषवाचक सर्वनामें.

| | एकवचन | अनेकवचन. | |
|---|---|---|---|
| प्रथम पुरुष | मी. | आह्मी | ( बोलणारा. ) |
| द्वितीय पुरुष | तूं. | तुह्मी. | ( ज्याशीं बोलावयाचें तो. ) |
| तृतीय पुरुष | तो.ती,तें. | ते.त्या,तीं. | ( ज्याविषयीं बो.तो. ) |

( २ ) **दर्शक** सर्वनामें जवळचा अथवा दूरचा पदार्थ दाखवितात. जसें—**ही** काठी, **तो** बोरू इ०

( ३ ) **संबंधी** सर्वनामें पुरुष किंवा दर्शक सर्वनामाशीं संबंध ठेवितात. जसें—**जो** मुलगा काल आला होता, तो कोण? **ज्या** पाशीं तूं निरोप सांगितला असशील, त्यास जावयास सांग. **जी, जें, जेवढें, जितकें** इ०

( ४ ) **प्रश्नार्थक** सर्वनामांचा उपयोग प्रश्न करा-

वयाचे वेळीं करितात. जसें–**कोण** हा मनुष्य ! त्यानें तुला **काय** सांगितलें ? **कसला, केवढा, कोणी** इ०

( ५ ) **सामान्य** सर्वनाम ह्मणजे ज्याचा अर्थ सामान्येंकरून होतो तें. जसें–कोण, कोणी, काय, अमका, भलता, फलाणा, सर्व, अवघा, कैक, वरकड, परस्पर, अन्योन्य इ०

९ **विशेषण** ह्मणजे नामाचा गुण दाखविणारा शब्द. जसें–काळा, लंगडा, हट्टी, मूर्ख इ०

( १ ) गुण दाखविणारीं **गुणवाचक** विशेषणें. जसें–लंगडा, पांगळा, हट्टी, मूर्ख इ०

( २ ) संख्या दाखविणारीं **संख्यावाचक** विशेषणें. जसें–एक, पांच, दहा इ० यांत प्रकार तीन.

( अ ) **क्रमवाचक** संख्या वि०–**पहिला**, दुसरा, दहावा इ०

( ब ) **आवृत्तिवाचक** ,, वि०–दुप्पट, दशगुणित इ०

( ३ ) **संख्यांशवाचक** ,, वि०–अर्धा, दीड, पाऊण इ०

१० ज्या शब्दाच्या योगानें एकाद्या क्रियेचा अथवा स्थितीचा बोध होतो, त्यास **क्रियापद** ह्मणावें. जसें–मी **करितों,** तो **बोलतो,** तूं **चालतोस** इ०

११ **लिंग** ह्मणजे नामांतील पुरुष, स्त्री वगैरे भेद ओळखण्याची जी विशेष खूण ती. लिंगें तीन आहेत. **पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग.**

( १ ) ज्याच्या पाठीमागें **तो हें** सर्वनाम योग्य

दिसतें त्या नामाचें पुल्लिंग जाणावें. जसें—तो **आंबा**, तो **बैल**, तो **खांब** इ०

( २ ) ज्याच्या पाठीमागें **ती** हें सर्वनाम योग्य दिसतें त्या नामाचें स्त्रीलिंग जाणावें. जसें—ती **चित्र**, ती **गाय**, ती दऊत इ०

( ३ ) ज्याच्या पाठीमागें **तें** हें सर्वनाम योग्य दिसतें त्या नामाचें नपुंसकलिंग जाणावें. जसें—तें **केळें**, तें **पागोटें**, तें **घर** इ०

१२ वचनांच्या योगानें नामाची संख्या एकच आहे कां पुष्कळ आहे हें समजतें. वचनें दोन. **एकवचन** व **अनेकवचन**.

( १ ) ज्या नामाची एकच संख्या असते, त्याचें एकवचन. जसें—आंबा, कपाट, पेटी इ०

( २ ) ज्या नामांवरून एकाहून अधिकांचा बोध होतो त्याचें अनेकवचन. जसें—आंबे, कपाटें, पेट्या इ०

१३ **विभक्ति** म्हणजे नामाचा दुसऱ्या एकाद्या नामाशीं किंवा क्रियेशीं संबंध दाखविणारे जे प्रत्यय त्यांसहित नामांचीं रूपें. विभक्ति ८ असून त्यांचे प्रत्यय खालीं लिहिल्याप्रमाणें:—

| | एकवचन | अनेकवचन. |
|---|---|---|
| प्रथमा— | नामाचें मुळचें रूप कायम रहातें. | |
| द्वितीया— | स-ला-तें. | स-ला-ना-तें. |
| तृतीया— | नें-एँ-शीं. | नीं-हीं-ईं-शीं. |
| चतुर्थी— | स-ला-तें. | स-ला-ना-तें. |
| पंचमी— | ऊन-हून. | ऊन-हून. |

| एकवचन | अनेकवचन. |
| --- | --- |
| षष्ठी—चा-ची-चें. | चा-ची-चें. |
| सप्तमी—त ईं-आँ. | त ईं-आँ. |
| संबोधन—नामाचें सामान्यरूप होतें. | नो. |

१४ क्रियापदाचें जें मुळचें रूप त्यास धातु ह्मणतात.

१५ क्रियापदाचे प्रकार आठ. १ सकर्मक, २ अकर्मक, ३ उभयविध, ४ भावकर्तृक, ५ सहाय, ६ शक्य, ७ प्रयोजक, ८ गौण अथवा सिद्ध.

१६ क्रियापदास रूप, भेद, अर्थ, काळ, प्रयोग, पुरुष, लिंग व वचन हीं असतात.

( १ ) रूपें दोन—करणरूप व अकरणरूप.

( २ ) भेद तीन—मूळरूप, प्रयोजक व शक्य.

( ३ ) अर्थ पांच—स्वार्थ, विध्यर्थ, संकेतार्थ, आज्ञार्थ, व संशयार्थ.

( ४ ) काळ तीन—भूत, वर्तमान व भविष्य.

( अ ) मागें गेला तो भूत.

( आ ) सध्यां चालत आहे तो वर्तमान.

( इ ) पुढें येणारा तो भविष्य.

( ५ ) प्रयोग चार—कर्तरि, कर्मणि, भावी व भावकर्तरि.

( अ ) कर्तरि प्रयोगांत क्रियापदाचें लिंग व वचन कर्त्याप्रमाणें फिरतें. यांत भेद दोन. सकर्मक कर्तरि व अकर्मक कर्तरि.

( १ ) ज्यांत कर्म असतें तो सकर्मक.

( २ ) ज्यांत कर्म नसतें तो अकर्मक.

( ब ) **कर्मणि** प्रयोगांत कर्ता तृतियान्त व कर्म प्रथमान्त असून क्रियापदाचें लिंगवचन कर्माप्रमाणें फिरतें.

( क ) **भावी** प्रयोगांत कर्ता तृतियान्त, कर्म द्वितियान्त व क्रियापद नेहमीं भूतकाळीं, नपुंसकलिंगीं, एकवचनीं असतें. यांतही सकर्मक व अकर्मक भावी असे दोन भेद आहेत.

( ड ) **भावकर्तरि** प्रयोगांत क्रियेचा मूळ अर्थ तोच कर्ता असून क्रियापद नेहमीं नपुंसकलिंगीं, एकवचनीं असतें.

१७ **क्रियाविशेषण** क्रियेचा गुण अथवा प्रकार दाखवितें. जसें–हळू, झटकन्, सावकाश इ० याचे प्रकार अनेक आहेत त्यांपैकीं कांहीं:

( १ ) स्थलवाचक–येथें, तेथें, इकडे इ०

( २ ) कालवाचक–काल, आज, उद्यां इ०

( ३ ) संख्यावाचक–एकदां, तीनदां इ०

( ४ ) क्रमवाचक–पहिल्यानें, पांचव्यानें इ०

( ५ ) निश्चयार्थक–खचित, निःसंशय इ०

१८ **उभयान्वयी** अव्ययाच्या योगानें एकाच जातीचे दोन शब्द अथवा दोन वाक्यें यांचा अन्वय होतो ह्मणजे संबंध जुळतो. यांतील भेद.

( १ ) समुच्चयवाचक–आणि, व आणखी.

( २ ) पक्षांतरबोधक–पण, परंतु, अथवा, किंवा, नाहींतर, किंबहुना इ०

( ३ ) न्यूनत्वबोधक–कदाचित्, क्वचित्, प्रायः, बहुतकरून इ०

( ४ ) **कारणबोधक**–कारण, कांकीं, त्यास.

( ५ ) **संकेतबोधक**–जर, तर, जरीं, तरीं, यद्यपि, तथापि, जर कां.

१९ **शब्दयोगी** अव्ययांचा संबंध नेहमीं सविभक्तिक ( ज्यांना विभक्ति प्रत्यय लावितां येतात अशा ) शब्दांशीं असतो. व हीं अव्ययें पुढें आलीं असतां त्या शब्दांचें सामान्यरूप होतें. जसें झाडावर, कागदांमध्यें, खालीं, कडे. मागें इ०

( अ ) यांत **शुद्धशब्दयोगी** अव्यय ह्मणून एक प्रकार आहे. त्याच्या योगानें शब्दांचें सामान्यरूप होत नाहीं. जसें–दऊतच, लेखणीही, मात्र, देखील, ना.

२० **केवलप्रयोगी** अव्ययांच्या योगानें मानसिक विकारांचें ज्ञान होतें. जसें–अहाहा ! वाहवा! थुः! अः! छीः ! इ०

---

## भाग २ रा.

## अनुस्वार.

### ( १ ) नामांसंबंधीं.

१ अकारान्त नामें खेरीज करून बाकी नपुंसकलिंगी नामांच्या अंत्याक्षरांवर[1] एकवचनीं व अनेकव-

---

१ अंत्य ह्मणजे शेवटचें व उपांत्य ह्मणजे शेवटच्याच्या जवळचें ह्मणजे अर्थात् मागचें.

चनीं नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें—मोतीं, दहीं, मिरीं, केळें पांखरूं, कुंकूं[2] इ०

२ अकारान्त नपुंसकलिंगी नामें अनेकवचनीं प्रथमा विभक्तींत असतां त्यांच्या अंत्याक्षरांवर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें—मंदिर-**मंदिरें**; देऊळ-देवळें; सूत्र **सूत्रें** इ०

३ क्रियावाचक धातुसाधित नामांच्या अंत्याक्षरांवर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें—काम **करणें** न **करणें** हें त्यांच्याकडे! फ्रेंचांना **लढणें** भाग पडलें. अभ्र आल्यानें सूर्य **दिसणें** फार कठीण.

**उपजणें मरणें** न चुके नरा॥ फिरत नित्य असे भवभोंवरा

४ तृतियान्त नामांच्या किंवा सर्वनामांच्या अंत्याक्षरांवर एकवचनीं व अनेकवचनीं नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें—**रामानें प्रेमानें** मुलांस आलिंगिलें. **त्यांनीं**-ही रामास **भक्तांनें** वंदन केलें. नंतर **उभयतांनीं** अयोध्येस गमन केलें.

एक**बाणें** वाळी **स्वामिंनीं** मारिला।सुग्रीव तारिला संकटांत रक्तनदीच्या **स्नानें पानें गेंयेंहि** वीर ते भुळले॥ मोरोपंत

५ नामांस किंवा सर्वनामांस अनेकवचनीं विभक्ति प्रत्यय लाविल्यानंतर त्यांतील उपांत्य अक्षरांवर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें—मुक्या **प्राण्यांस** त्रास देऊं नये. पकड त्या **चोरांना** व बांध **त्यांच्या** मुस्क्या. **चाकरांस** दयेनें वागवावें.

कवी **देवांचे** रूपकर्ते॥ कवी **ऋषींचें** महत्व वर्णिते॥ नाना **शास्त्रांचें** सामर्थ्य तें॥ कवी वाखाणिती॥

---

२ या नियमास लोणी इ० कांहीं शब्द अपवादक आहेत.

६ ज्या एकवचनी नामांस बहुमानार्थी योजितात, त्यांस विभक्ति प्रत्यय लाविल्या नंतर त्यांच्या उपांत्य अक्षरांवर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें—शिवाजी **महाराजांचा** मोर्चा दिल्लीकडे वळला. **रावसाहेबांचें** पत्र आलें. **आप्पासाहेबांचें** पुस्तक छापून प्रसिद्ध झालें.

७ सप्तमीचा 'त' प्रत्यय लागून अंत झालेल्या सविभक्तिक शब्दांच्या उपांत्य अक्षरांवर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें—**रामायणांत** सीतेचें सदाचरण वर्णिलें आहे. या **पुस्तकांत** चांगल्या गोष्टी आहेत. **दौतींत** शाई नाहीं.

ये **अशांत सदनांत** हरी तो ॥

८ सप्तमीचे दुसरे प्रत्यय 'ई' किंवा 'आँ' यांपैकीं एकादा प्रत्यय लागून नामांचा अंत झाला असल्यास त्या नामांच्या अंत्याक्षरांवर ह्मणजे ज्या अक्षरांत हीं अक्षरें मिळालीं असतील त्या अक्षरांवर अनुस्वार द्यावा. जसें—तो गृध्रराज पक्षी राम**नामीं** रत होत्साता रामास **वनीं** भेटला. लक्ष्मण **घरीं** नसतांना रावणानें सीतेस नेलें. **पायां** पडतों.

**वनीं रणीं** शत्रुजलाग्नि **संकटीं** ॥ वामन.

सुख व्हावें तरि धर्माप्रति ह्मण **माथां** वसें नसें दूर ॥ ऐशी माझी बाई ऐकतांचि वाणी ॥ **डोळां** आलें पाणी भावोजींच्या ॥ मोरोपंत.

९ जर एकादें नपुंसकलिंगी नाम षष्ठ्यंत नामाच्या किंवा सर्वनामाच्या पुढें येईल तर त्या षष्ठ्यंत नामाच्या किंवा सर्वनामाच्या अंत्याक्षरावर नेहमीं अनुस्वार

द्यावा. जसें—दुसऱ्याचें पुस्तक परवानगीवांचून घेऊं नये. कृष्णाचें शेत चांगलें पिकलें.

माझें तुझेंचि बळ तो इतुकेंचि नाहीं ॥
त्याचेंच कीं बळ असे सकळां जनांही ॥ वामनः

१० षष्ठयंत नामाचा किंवा सर्वनामाचा नपुंसकलिंगी नामाकडे संबंध असूनही जर त्याचा अर्थ सामान्यरूपासारखा होत असला, ह्मणजे षष्ठयंत शब्दापुढें येणारें नाम जर सविभक्तिक असलें तर त्या षष्ठयंत शब्दाच्या अंत्याक्षरावर अनुस्वार देऊं नये. जसें—नारायणाचे घरीं जा व त्याची नीट समजूत कर. राजाचे मंदिरास सोन्याचे कळस आहेत.

तयाचे मस्तकीं नाचे नारायण। आरंभीं गायन जगदीश

## ( २ ) सर्वनामांसंबंधीं.

११ तूं, त्वां, म्यां या सर्वनामांवर नेहमीं अनुस्वार द्यावा.

१२ मी, आह्मी, तुह्मी, कोणी हीं सर्वनामें जेव्हां तृतिया विभक्तींत असतात, तेव्हां त्यांच्या अंत्याक्षरांवर अनुस्वार द्यावा. जसें—मीं राजारामास उपदेश केला. आह्मीं व तुह्मीं काय करावें? मला कोणीं जागें केलें?

१३ भिन्न भिन्न लिंगी पुष्कळ नामांस दर्शविणारें जें सर्वनाम असतें, तें नपुंसकलिंगी मानून त्यावर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें—रामा, गोविंदा, मनी व तिचें मूल हीं गांवास गेलीं.

## ( ३ ) विशेषणांसंबंधीं.

१४ आकारान्त विशेषणापुढें एकवचनी नपुंसकलिंगी

नाम आलें तर ते विशेषण एकारान्त होतें; व अनेकवचनी नाम आलें तर तें ईकारान्त होतें. अशा रूपांच्या अंत्याक्षरांवर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें—**चांगलें** गाणें ह्मण. **लंगडीं** वासरें उगीच धडपडतात.

**जाणतें** लेंकरूं ॥ माता लागे दुरी धरूं ॥
वाइटानें **भलें** ॥ हीनें दाविलें **चांगलें** ॥ तुकाराम.

१५ परंतु त्याच नपुंसकलिंगी नामास विभक्ति प्रत्यय लागल्यानें जर त्या विशेषणाचें सामान्यरूप होईल तर, त्या विशेषणाच्या अंत्याक्षरावर अनुस्वार देण्याची गरज नाहीं. जसें—**चांगल्या** माणसांनीं असें अभद्र बोलूं नये. **तांबड्या** फुलांचा वास चमत्कारिक असतो.

**चांगल्या** वचनीं मानितां विश्वास ॥
काय तुमचें यास वेंचे सांगा ॥

१६ **हजारों, लाखों** व **शेंकडों** या तीन संख्यावाचक विशेषणांच्या अंत्याक्षरांवर नेहमीं अनुस्वार द्यावा.

१७ संख्यावाचक विशेषणापुढें शंभर या अर्थी **शें** हा प्रत्यय लागतो; त्या **शें**वर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें—**तीनशें** घोडस्वार तयार आहेत. **पांचशें** आंबे पिकले.

१८ सकर्मक धातूंस **ईंव** हा प्रत्यय लागून सिद्ध झालेल्या विशेषणांच्या उपांत्य अक्षरांवर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें—कांत + ईंव=**कांतींव**. कोर+ईंव=**कोरींव**. तसेंच **घडींव, ओतींव, पिळींव, ऐकींव, आटींव** इ०

१९ आळू हा प्रत्यय नामांस लागून सिद्ध झालेल्या विशेषणांवर केव्हांही अनुस्वार देऊं नये. जसें—झोंपाळू, लाजाळू, कृपाळू, दयाळू इ०

( ४ ) क्रियापदांसंबंधीं.

२० वाक्यांत प्रथम पुरुषी कर्ता असतां त्याच्या अनुरोधानें चालणाऱ्या क्रियापदाच्या अंत्याक्षरावर वर्तमान व भूतकाळीं नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें—मी काम करितों. मी आहें. मौज पहात होतों तोंपर्यंत तहानभूक विसरलों.

जधीं कांहीं कांहीं हरिकवि असे शब्द शिकलों ॥
तधीं मी सर्वज्ञ द्विपसम मदें याच भरलों ॥ वामन.

२१ कर्तरि प्रयोगांत कर्ता व कर्मणि प्रयोगांत कर्म नपुंसकलिंगीं असतां, त्यांच्या अनुरोधानें चालणाऱ्या क्रियापदांच्या अंत्याक्षरांवर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें—फूल पडतें. त्यानें फळ तोडिलें.

निष्फळ होतीं मेवें त्यजिलीं आलीं हि जीविकासेतें ॥
मोरोपंत.

२२ भावी व भावकर्तरि प्रयोगांत क्रियापदांच्या अंत्याक्षरांवर नेहमीं अनुस्वार द्यावा; जसें—गुरुजींनीं विद्यार्थ्यांस शिकविलें. त्याला कळमळलें. तिला फावलें.

वद वत्से काय कसें वर बरवा पाहिला न लाजावें ॥
या गुरुनें धन्य असें ह्मणुनी स्वमुखें तुला मला जावें ॥
मोरोपंत.

२३ स्वार्थीं, द्वितिय पुरुषीं, अनेकवचनीं, वर्तमान व भूतकाळीं क्रियापदांच्या अंत्याक्षरांवर अनुस्वार द्यावा.

जसें–तुह्मी गांवास **निघालां**? आपण **होतां** ह्मणून आलों.

जेव्हां तूं दुर्योधन, दुःशासन, शकुनि एकमति **झालां** ॥
कैसें कपटद्यूतीं चित्तींहि न धर्म **लंघितां भ्यालां** ॥
मोरोपंत.

**संभवलां** कवणाचे वंशीं सांगा हो अकलंकीं ॥
उभे **असां** कां **भागतसां** हो या बैसा पर्यंकीं ॥
रघुनाथ पंडित.

२४ गौण अथवा सिद्ध क्रियापदांवर केव्हांही अनुस्वार देऊं नये. जसें–मला लाडू **पाहिजे**. त्याला पुस्तक **नको**. **नये, नलगे** इ०

**नको** रे मना क्रोध हा अंगिकारूं ॥
**नको** रे मना काम नाना विकारू ॥ रामदास.

## ( ५ ) क्रियाविशेषणांसंबंधीं.

२५ अकारान्त खेरीज करून बाकीच्या कालवाचक क्रियाविशेषणांच्या अंत्याक्षरांवर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें–**जेव्हां** तूं जाशील **तेव्हां** मी येईन. **केव्हां** कां पाऊस पडेना! **आतां** एवढ्या पावसावर **यंदां** जोंधळा चांगला पिकेल.

२६ स्थलवाचक क्रियाविशेषणाचें अंत्याक्षर जर थकार असेल तर त्यावर अनुस्वार द्यावा; डकार असेल तर देऊं नये. जसें–आतां **तेथें** जाऊन काय करणार? **येथें** गोरक्षणी सभा स्थापन झाली. **जेथें जेथें** जावें **तेथें तेथें** हीच तऱ्हा! **इकडे** येऊं नका. **तिकडे** काय पहातां? **पलीकडे** चला.

**येथें** काय रे वाजतें ॥ **कोठें** काय गजबजतें ॥ रामदास.

२७ संख्यावृत्तिवाचक व क्रमवाचक क्रियाविशेषणांच्या अंत्याक्षरांवर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें–हा अपराध तूं **दोनदां** केलास. या खेपेस **एकदां** क्षमा करीन. **पहिल्यानें** आपण गोड बोलावें ह्मणजे दुसरे बोलतात.

**एकदां** तरुण बाल **एकदां** ॥ भाग्यवंतहि अभाग्य **एकदां**
**एकदां** जरठ जाय सत्वरीं ॥ धर्मराज सदना नटापरी ॥

वामन.

२८ आकारान्त व ईकारान्त क्रियाविशेषणांच्या अंत्याक्षरांवर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें–तैमुरलंगानें लोक **चरचरां** चिरले. तो **खदखदां** हांसतो. त्यानें **चटदिशीं** उडी मारिली.

अहो नको **फरफरां** वेऊं दे सांवरोनि हा पदर ॥

मोरोपंत.

**भडभडां** जन शोणित ओकुनी ॥ **धडधडां** पडले समरांगणीं

## ( ६ ) शब्दयोगी अव्ययांसंबंधीं.

२९ अनेकवचनी नामाच्या किंवा सर्वनामाच्या पुढें जर शब्दयोगी अव्यय आलें तर त्या नामाच्या किंवा सर्वनामाच्या सामान्यरूपावर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें–कृष्णानें **मित्रांसाठीं** हरप्रयत्न केले. राजानें **लोकांकरितां** धर्मशाळा बांधाव्या.

३० **आंतील** व **आंतून** हीं शब्दयोगी अव्ययें ज्या नामांस अथवा सर्वनामांस लागतील, त्या शब्दांतील अंत्याक्षरावर–ह्मणजे ज्या अक्षरांत वरील शब्दांतील **आ** हा स्वर मिळाला असेल त्यावर–अनुस्वार

द्यावा. जसें-शिवाजी **वेढ्यांतून**[1] निसटला. त्यानें **कोंकणांतील** अनेक किल्ले घेतले. मी **शाळेंतून** आलों.

३१ अकारान्त खेरीज करून बाकीच्या[2] शब्दयोगी अव्ययांच्या अंत्याक्षरांवर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें-**सभोंवतीं, देखतां, करितां, पाशीं, खालीं, ऐवजीं, मध्यें, पुढें, पावेतों** इ०

## ( ७ ) धातुसाधितांविषयीं.

३२ वर्तमानकालवाचक धातुसाधितें, ज्यांस **तां** हा प्रत्यय लागतो त्यांच्या अंत्याक्षरांवर व ज्यांस **तांना** हा प्रत्यय लागतो त्यांच्या उपांत्य अक्षरांवर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें-राम तेथें **असतां** मारीच राक्षस

---

१ जर तें नाम आकारान्त पुल्लिंगी असलें तर 'आ'च्या जागीं 'या' असा आदेश होतो. जसें-आंबा + आंतील = आंब्यांतील. तसेंच तें आकारान्त स्त्रीलिंगी असतील, तर एकवचनीं 'आ'च्या जागीं 'ए' आदेश होतो व अनेकवचनीं 'आ'च कायम रहातो. जसें पागा + आंतून = पागेंतून (ए० व०); पागा + आंतून = पागांतून (अ० व०). तें नाम इकारान्त पुल्लिंगी असलें तर 'इ'च्या जागीं 'ई' आदेश होतो; जसें-कवि + आंतील = कवींतील. ईकारान्त पुल्लिंगी नामांत 'ई'च्या जागीं 'या' आदेश होतो. जसें-शास्त्री + आंतील = शास्त्र्यांतील. तात्पर्य काय कीं विभक्ति प्रत्यय लावितांना जे फेरफार होतात, तेच येथेंही होतात. कसेंही झालें तरी 'तील' किंवा 'तून' हे प्रत्यय ज्या अक्षरांपुढें येतील त्यांवर अनुस्वार द्यावा.

२ या नियमास 'जोगा,' 'सारखा' इ० काहीं व 'चा' 'ळा' इ० प्रत्यय लागून 'पुढचा' 'मागचा' अशा प्रकारचीं होणारीं शब्दयोगी अव्ययें अपवादक आहेत.

ओरडला. सुभद्रा निजून **उठतांना** कांहीं शब्द बोलत असे. लखू **जेवतांना** पाणी फार पितो.

हें न **घडतां** जळेन ज्वलनीं होतांचि अस्तमित तरणी ॥
आई **ह्मणतां रडतां पडतां** दाटून कां श्रमामाजीं ॥

मोरोपंत.

३३ नपुंसकलिंगी विधिवाचक धातुसाधितांच्या अंत्याक्षरांवर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें—मीं **निजावयाचें** मनांत आणिलें आहे. बक्षीस न **द्यावें** असें सर्वांचें मत पडलें.

३४ निमित्तकालवाचक धातुसाधितांच्या अंत्याक्षरांवर नेहमीं अनुस्वार द्यावा. जसें—तुला तो मदत **करूं** लागेल. **उठूं** नको. **चालूं** लाग. **रडूं** नको. **बोलूं** नको.

कुंतीस काय **सांगूं** कृष्णेला **दाखवूं** कसें वदन ॥

मोरोपंत.

३५ ज्यांवर नियमितपणें अनुस्वार असतोच असे कांहीं शब्द मराठी भाषेंत आहेत, त्यांपैकीं कांहीं—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अंमल | आंत | ओंठ | कांकडा | कांठ |
| अंमळ | आंतडें | ओंवण | कांकडी | कांत |
| अंवस | आंव | ओंवळा | कांकण | कांतणें |
| आंकडा | आंवळणें | ओंवा | कांकडणें | कांप |
| आंखणी | आंवळा | ओंवाळणें | कांख | कांपणें |
| आंखणें | आंवरणें | ओंवी | कांच | कांपरा |
| आंखूड | ऊंस | कंवटी | कांचोळी | कांस |
| आंच | ओंचा | कंवठ | कांच्या | कांसरा |
| आंचविणें | ओंटा | कां | कांटा | कांसव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कांसें | गींहवर | जांवई | ठोंसरा | पांकळी |
| कांसोटा | गांठ | जों-पर्यंत | डांक | पांकोळी |
| कांहीं | गांठणें | झांकणें | डांकीण | पांखरूं |
| कीं | गांठलें | झांप-झेंप | डांस | पांच |
| कींव | गांठोडें-ळें | झांशी | ढांपा | पांवा |
| केंकावणें | गांव | झोंकणें | ढांसणें | पावेतों |
| केंस | गोंवर-री | झोंप | ढांसळणें | पिंवडी |
| कोंकण | गोंवें | झोंपडी | ढेंकर | पिंवळा |
| कोंकरूं | घांट | झोंपाळा | ढेंकूण | पेंकट |
| कोंकलणें | घांस | टंवका | ढेंकूळ | पेंच |
| कोंका | घोंट | टांक | ढेंप | पेंठ |
| कोंपर | घोंटा | टांकणखार | ढेंपण | पेंव |
| कोंपरा | घोंटाळा | टांकसाळ | ढोंपर | पोंखरणें |
| कोंवळा | घोंटींव | टांका-की | तांत | पोंच |
| कोंहोळा | घोंस | टांच | तांतड | पोतें |
| खांकरणें | घोंसाळें | टांचण | थोंटा-टी | पोंवळें |
| खांच | चंवरी | टांचणी | दंव | पोंहोचणें |
| खेंटर | चांचपणें | टेंकडी | दांत-री | फांकणें |
| खेंटें | चांचा | टेंकणें | दांतवण | फांटा |
| खोंक | चांफा | टोंक | देंठ | फांस |
| खोंकड | चिंवट | टोंचणें | धांवणें | फांसा |
| खोंच | चेंचणें | ठेंच | धांवा | फेंकणें |
| खोंप | चोंच | ठोंकर | धोंकटी | फेंटा |
| खोंपट | चोंचरा | ठोंठों | नांव | फेंफरें |
| खोंवणें | जातें | ठोंसा | नाहीं | फेंस |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| बांक | यंत्र् | वांई | वांसरूं | सांपडणें |
| बांधणें | रेंटणें | वांकणें | वांसा | सांवरणें |
| बांथट | रेंव-ट | वांकडा | वेंचणें | सांवळा |
| बांथाटी | रेंख | वांकनीस | वेंचा | सुद्धां |
| भिंवई | रेंवणें | वांकस | वेंटाळें | सांवळें |
| भोंक | रेंवळी | वांकी | शींव | हंसूं |
| भोंकर | लांकूड | वांकोरा | शेंपूट | हांसणें |
| भोंपळा | लांच | वांचणें | शेंफारणें | हांक |
| भोंवतीं | लांपट | वांचून | शेंवती | हांकणें |
| भोंवगें | लांव | वांटा | शेंवरी | हांसळी |
| भोंवरा | लांवसट | वांटणी | संवय | हांशील |
| भोंवळ | लेंक-रूं | वांयां | सांकडें | हिंव |
| भोंसकणें | लेंकवळा | वांवडें | सांखळी | हिंवाळा |
| म्यांव् | लोंकर | वांसणें | सांठविणें | हेंकड |

३६ कित्येक शब्दांचे निरानिराळे अर्थ असतात, एका अर्थाचे वेळीं त्यांवर अनुस्वार असतो व दुसऱ्या अर्थाचे वेळीं असत नाहीं. असे कांहीं शब्द.

| शब्द | अर्थ | शब्द | अर्थ |
|---|---|---|---|
| आत | बापाची बहीण | आंत | शब्दयोगी अव्यय |
| टाका | टाकून द्या. | टांका | शिवणीचा |
| वाचणें | पुस्तक इ० | वांचणें | जगणें |
| वाटणें | चुर करणें | वांटणें | वांटणी करणें |
| नाव | नौका, होडी | नांव | नाम ( ठेवलेलें ) |
| कापणें | चिरणें | कांपणें | कंपित होणें |

| शब्द | अर्थ | शब्द | अर्थ |
|---|---|---|---|
| लेक | मुलगा | लेंक | मुलगी |
| वासा | फांका | वांसा | घरावर घातलेलावेळू |
| परवा | फिशाद | परवां | कांहीं दिवसांपूर्वीं |
| पाच | जवाहिर | पांच | आंकड्यांपैकीं |
| जरी | ( पागोट्यादिकांचा ) जर याचें बहुवचन | जरीं | संकेतबोधक उभन्वयी अव्यय. |
| जावयास | जाण्याकरितां | जांवयास | मुलीच्या नवऱ्यास |
| वाचून | वाचल्यानंतर | वांचून | शिवाय |
| काव | त्रास. रागाव | कांव | तांबडा पदार्थ |
| आस | आशा | आंस | कणा |
| घाट | नदीचा | घांट | घंटा |
| जातें | जा धातूचें तृ० पु० नपुं. एक० | जांतें | पिठ दळण्याचें |
| पावा | दया करा | पांवा | मुरली |
| लाव | चिकटीव | लांव | भूतांतील एक जात |
| शीव | स्पर्श कर | शींव | गांवची सीमा |
| जाया | बायको | जांयां | जखमी |
| गावें | गायन करावें | गांवें | खेडींपाडीं |
| मुळी | झाडाचें पाळ | मुळीं | अगदीं |
| टाक | टाकून दे | टांक | शेराचा ७२ हिसा |
| वाट | रस्ता | वांट | वांटणी करून दे. |
| इ० | इ० | इ० | इ० |

# भाग २ रा.

## ऱ्हस्वदीर्घ.

१ ऱ्हस्वस्वर उच्चारावयास जो काल लागतो, त्यास **मात्रा** ह्मणतात.

२ ज्यास एक मात्रा असते तें **ऱ्हस्व.** व ज्यास दोन असतात तें **दीर्घ.**

### ( १ ) नामांसंबंधीं.

३ जर इकारान्त व उकारान्त संस्कृत नामें वाक्यांत प्रथमा विभक्तींतच असलीं, तर तीं एकवचनीं व अनेकवचनीं ऱ्हस्वच रहातात. जसें—भक्ति, रुचि, ऋतु, गुरु इ०

**टीप**—हीं नामें पुष्कळ आहेत. परंतु मराठी भाषेंत वारंवार येणारीं कांहीं देतों.

### इकारान्त.

अग्नि, अंगुलि, अंघ्रि, अतिथि, अद्रि, अनुमति, अवधि, अस्थि, आकृति, आवृत्ति, उक्ति, उत्पत्ति, उपपत्ति, उपरति, ऋषि, कपि, कवि, कीर्ति, कृति, क्रांति, ख्याति, गति, छत्रपति, दृष्टि, धृति, ध्वनि, निधि, निवृत्ति, नीति, नृपति, पति, पंक्ति, प्रकृति, प्रवृत्ति, प्रसिद्धि, प्राप्ति, प्रीति, बुद्धि, भक्ति भीति, भूपति, भ्रांति, मति, मुनि, युक्ति, रवि, रीति, रुचि, वनस्पति, विनंति, विभक्ति, विश्रांति, विज्ञप्ति, वृत्ति, वृष्टि, व्यक्ति, व्याधि, शक्ति, शांति, श्रुति, संगति,

संतति, संधि, संपत्ति, समृद्धि, सृष्टि, स्तुति, स्थिति, स्मृति इ०

### उकारान्त.

अणु, अश्रु, अस्तु, ऋतु, केतु, गुरु, चक्षु, जंतु, तरु, धातु, देवदारु, धेनु, पशु, प्रभु, बाहु, बिंदु, भानु, मेरु, रिपु, विभु, विष्णु, शत्रु, साधु, सिंधु, हेतु, इ०

४ वरील प्रकारच्या संस्कृत नामांस जर विभक्ति प्रत्यय लागेल, तर त्यांच्या शेवटील ऱ्हस्व इ व ऱ्हस्व उ यांजबद्दल अनुक्रमें दीर्घ ई व दीर्घ ऊ होतात. जसें— अग्नि-**अग्नीस**. भानु-**भानूचा** इ०

५ दीर्घ ईकारान्त अथवा ऊकारान्त नामें कोणताही विभक्ति प्रत्यय लाविला तरी दीर्घच रहातात. जसें—कादंबरी-**कादंबरीचा**. काठी-**काठीनें**. पेरू-**पेरूला**.

**टीप**—वरील नियमास अनुसरून मराठींत येणारीं नामें.

### ईकारान्त.

कस्तुरी; कुमारी; केसरी; छाटी, जननी; तरुणी; नदी; नारी; पत्नी; पृथ्वी; मही; योगी; रजनी; लक्ष्मी; सखी; हस्ती इ०

### ऊकारान्त.

भीरू; भू; वधू इ०

६ अंत्याक्षर अकारान्त असून उपांत्य इ-उकारान्त असेल तर तें नेहमीं दीर्घ लिहावें. जसें—पीठ, मीठ, लांकूड, गीत इ०

७ ज्याचें उपांत्य अक्षर ई-ऊकारान्त आहे अशा नामास जर विभक्ति प्रत्यय लाविला, तर तो प्रत्यय लागतांना तें उपांत्य अक्षर ऱ्हस्व होतें. जसें—विहीर-विहिरींत. देऊळ-देउळांचा.

८ वरील नियम संस्कृत शब्दांस लागू नाही. जसें—गीत-गीताचा. वीर-वीरांना इ०

## ( २ ) सर्वनामांसंबंधीं.

९ ईकारान्त व ऊकारान्त ह्मणून जितकीं सर्वनामें आहेत तीं सर्व नेहमीं दीर्घ लिहावीं. जसें—मी, तूं, ही, अशीं, जशी, कोणी इ०

१० एकाक्षरी स्त्रीलिंगी नामांस प्रथमा, द्वितिया, पंचमी, सप्तमी या विभक्ति लावितांना तीं नेहमीं दीर्घच लिहितात. जसें—तीस; तीहून; तींत इ०

११ एकाक्षरी स्त्रीलिंगी सर्वनामांस तृतिया, चतुर्थी किंवा षष्ठी विभक्तींचे प्रत्यय लागतांना तो प्रत्यय जर अकारान्त असेल तर तीं सर्वनामें दीर्घच लिहितात. व अकारान्त नसेल तर मात्र ऱ्हस्व लिहितात. जसें—ती+स=तीस. ती+चा=तिचा.

**टीप**—यांत स हा प्रत्यय अकारान्त आहे ह्मणून ती हें सर्वनाम दीर्घच राहिलें. परंतु पुढें **चा** हा प्रत्यय अकारान्त नाहीं ह्मणून मात्र तें ऱ्हस्व झालें. याचप्रमाणें जिला, तिला, हिनें, हीस, जीस इ०

१२ तूं या द्वि० पु० वाचक सर्वनामास विभक्ति प्रत्यय लावितांना वरील नियम लक्ष्यांत ठेऊन तें ऱ्हस्व व दीर्घ लिहावें. जसें—तुला, तुझा इ०

## ( ३ ) क्रियापदांसंबंधीं.

१३ अनेकाक्षरी सकर्मक क्रियापदें वर्तमानकाळीं असतां त्यांचीं उपान्त्य अक्षरें नेहमीं ऱ्हस्वच लिहावीं. जसें–करितो, वाचितो, निजवितो इ०

१४ दोन अक्षरी धातूंचें पहिलें अक्षर दीर्घ असल्यास, त्याचीं क्रियापदें होतांना तें अक्षर ऱ्हस्व होतें. जसें–फीर फिरतो. ऊठ उठतो. भूल-भुलतो इ०

## ( ४ ) धातुसाधितांसंबंधीं.

१५ एकाक्षरी धातूचें निमित्तकालवाचक किंवा पूर्वकालवाचक धातुसाधित अव्यय करितांना ऊन हा प्रत्यय त्या धातुपुढें कायम ठेवावा. ह्मणजे ऊ स्वरांतील काढावा. जसें–दे-देऊन. घे-घेऊन. ने-नेऊं. ये-येऊं इ० व इतर धातूंच्या अंत्य अक्षरांत ऊ मिळवावा. जसें–फिरून, मरूं इ०

१६ वकारान्त धातूस निमित्तकालवाचक किंवा पूर्वकालवाचक धातुसाधित अव्यय करितांना त्यापुढें व्यंजनांतील वूच कायम ठेवावा. जसें–ठेव-ठेवून. खोंव-खोंवून. पावूं. मावूं इ०

१७ पूर्वकालवाचक धातुसाधित अव्ययाचें उपांत्य अक्षर व निमित्तकालवाचकाचें अंत्य अक्षर नेहमीं दीर्घच लिहावें. जसें–बोलून थकला, तेव्हांच गप्प बसला. काय करूं !

## किरकोळ नियम.

१८ वान्, मान्, चित् इ० प्रत्यय लागून झालेल्या शब्दसाधितांच्या अंत्याक्षरांचा कोणी कोणी

पाय मोडीत नाहींत; तसाच लिहितात. तसें करणें गौण पक्ष आहे. पाय मोडून लिहावें हा उत्तम पक्ष. उदाहरण—धनवान्, मौल्यवान्, श्रीमान्, क्वचित्, कदाचित् इं०

१९ पाहणें, पहाणें; राहणें, रहाणें; इत्यादि शब्द लिहितांना हल्लीं फार घोंटाळा दिसून येतो. असें न होतां सर्वत्र एकच रीति असावी हें इष्ट आहे. वरील क्रियांत मूळधातु **पहा, रहा** अशाच निघतात. **पाह, राह** अशा निघत नाहींत. करितां **पहाणें, रहाणें** असेंच लिहिणें प्रशस्त होय.

२० मला ती गोष्ट सांगतोस **का**? तूं असें **कां** करितोस? यांतील पहिलें **का** काय या अर्थी योजिलें आहे. ह्मणून त्यावर अनुस्वार देण्याची गरज दिसत नाहीं. परंतु दुसरें प्रश्नार्थक अव्यय आहे; त्यावर अनुस्वार द्यावा.

२१ **उपयोगी** हा शब्द जेव्हां सप्तम्यंत असतो तेव्हां त्याच्या अंत्याक्षरावर अनुस्वार द्यावा; व जेव्हां विशेषण असतो तेव्हां देऊं नये. जसें—तें पुस्तक **उपयोगीं** आहे ह्मणजे उपयोगांत आहे. **उपयोगी** पुस्तकें माझीं मला हवींत. यांत उपयोगी हें विशेषण आहे.

२२ कित्येक शब्दांत बोलतांना यकार येतो; परंतु तो लिहितांना येत नाहीं असे कित्येक शब्दः—

अजब; अर्जी; आचार; उच्चार; कजाग; खोजा; गचाळ; घडवंची; चर्म; चार; चिंच; चोवीस; चंची,

छचोर; जामात; तशांत; दशा; पंचमी; पंचांग; मुंज; योजना; रचना; लचांड; वाचन; विजय; विचार; राजाला; (प्रजेचा पालनकर्ता) संचार; सजा; हजाम इ०

स्त्रीलिंगी एकवचनी क्रियापदांस वर्तमानकाळीं यकार लावावा. जसें—मी **करित्यें,** ती **येत्ये,** ती **देत्ये** इ०

---

## भाग ४ था.

## लेखनपद्धति.

**सूचना**—मागील भागांत सांगितलेल्या नियमांबरहुकूम शुद्ध लिहिण्याचा नेहमीं प्रयत्न करावा.

१ प्रत्येक शब्द निरनिराळा तोडून लिहावा. ह्मणजे वाचणारांस सोईवार पडतें.

२ कोणताही विभक्तिप्रत्यय नामापासून तोडून निराळा लिहूं नये. जसें—**रामास** व **गोविंदास** बोलाव.

३ जो शब्द समासयुक्त असेल, तो शब्द एक समजून जोडून लिहावा. ह्मणजे ज्या शब्दांचा समास होतो ते शब्द तोडून लिहूं नयेत. जसें—त्या **भक्तवत्सल** प्रभूपाशीं क्षमा मागितली. **रघुवंशभूषण रामानें** रावणास युद्धामध्यें मारिलें.

४ विशेषणसामान्यरूप नामापासून निराळें लिहावें. जसें—**लंगड्या** मनुष्यानें झाडावर चढूं नये. **चांगल्या** मनुष्यानें चढावें.

५ एकाक्षरी शुद्धशब्दयोगी अव्ययें जीं 'च, ही, ना,' तीं तोडून कधींही निराळीं लिहूं नयेत. जसें–तें काम रामासच योग्य. रामाबरोबर लक्ष्मण व सीताही होती. हें काम मींच करणारना ?

६ अपादानार्थी 'पेक्षां, पासून, कडून, हून, वरून' हीं अव्ययें शब्दांस जोडून लिहावींत. जसें–कोल्हापुराहून गेला. झाडापासून फळ पडतांना पाहिलें. त्यापेक्षां तो उंच आहे. त्यांना राणीसाहेबांकडून रावसाहेब हा किताब मिळाला. त्यावरून तो फार शेफारला.

७ तृतिया विभक्तीचीं अर्थदर्शक जीं 'करून, द्वारें, मुळें,' इत्यादि अव्ययें तीं शब्दापासून निराळीं लिहूं नयेत. तर तो सर्व शब्द एक समजून एकत्र लिहावा. जसें–त्या बाणेंकरून तो मृत झाला. त्याच्याद्वारें तो मला भेटला. त्यामुळें मी त्यांचा फार आभारी आहें.

## भाग ५ वा.

## विरामचिन्हें.

१ वाक्याचा अर्थ स्पष्ट समजण्याकारितां लेखनांत व वाचनांत या चिन्हांचा फार उपयोग होतो. ह्मणून तीं चिन्हें प्रथम दाखवून नंतर तीं कोठकोठें व कशीं उपयोगांत आणावीं याबद्दल नियम सांगूं.

| विरामचिन्हें. | संज्ञा. |
|---|---|
| . .... .... .... .... | पूर्णविराम. |
| , .... .... .... .... | स्वल्पविराम. |
| : .... .... .... .... | अपूर्णविराम. |
| ; .... .... .... .... | अर्धविराम. |
| ! .... .... .... .... | उद्गारचिन्ह. |
| ? .... .... .... .... | प्रश्नचिन्ह. |
| " " .... .... .... .... | अवतरणचिन्ह |
| ( ) .... .... .... .... | कौंस. |
| — .... .... .... .... | संयोगचिन्ह. |

२ जें वाक्य सबंध आहे, ह्मणजे त्यांत तुकडे तुकडे नाहींत, त्यांत विराम लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. वाक्य पूर्ण झाल्यानंतर **पूर्णविरामाचें** शून्य द्यावें. जसें—पूर्वी हिंदुस्थानांत पुष्कळ क्षत्रिय होते. भार्गवराम तापट स्वभावाचा होता.

३ जेथें अर्थाचा संबंध न राहतां वाक्य संपतें, तेथें **पूर्णविराम** लिहावा. जसें—त्या सरदारानें दहा हजार सैन्यानिशीं दौलताबाद घेतली.

४ सरळ वाक्यांत जर मध्येंच इतर वाक्यें किंवा तुटक वाक्यें आलीं, तर त्या वाक्यांच्या आरंभीं व शेवटीं **स्वल्पविराम** दिला पाहिजे. जसें—एक श्रीमंत ह्मातारा, आपल्या मुलास सर्व संपत्ति देऊन, आपण भीक मागत हिंडत होता.

( अ ) जर वाक्यांत दोन, तीन किंवा त्यांपेक्षां जास्त कर्ते अथवा कर्में अथवा कोणत्याही प्रकारचे

सजातीय शब्द एकापुढें एक आले, तर त्यांमध्यें **स्वल्पविराम** देऊन ते शब्द निरनिराळे दाखवावे. जसें–रामचंद्रपंतांच्या घरीं गोविंदा, ठकी, यमुना, गोपाळा व रघुनाथ हीं भोजनास आलीं होतीं. त्यांपैकीं यमुनेस लिहितां, वाचतां, गातां व शिवतां येत होतें.

( ब ) वरील प्रकारच्या दोन शब्दांमध्यें जर उभयान्वयी अव्यय आलें तर **स्वल्पविरामाची** जरूर नसते. जसें–बाळा आणि विनायक गांवीं गेले आणि परत आले.

( क ) जर उभयान्वयी अव्ययाच्या योगानें निरनिराळीं सरळ वाक्यें व तुटक वाक्यें पडत गेलीं, तर तीं दर्शविण्याकरितां उभयान्वयी अव्ययाच्या पाठीमागें **स्वल्पविराम** दिला पाहिजे. जसें–माझें प्राणाहून प्रिय असें बालक जरी त्यांनीं वधिलें, किंबहुना त्यांनीं माझें सर्वस्व हरण केलें, तथापि मी डगमगणार नाहीं.

( ड ) वाक्यांत कोठेंही, अगर वाक्याच्या आरंभीं जर संबोधन आलें, तर त्याच्यापुढें **स्वल्पविराम** अवश्य द्यावा. जसें–ईश्वरा, मला कां छळतोस ?

( ई ) वाक्यामध्यें एकाद्या शब्दापुढें जर त्याचाच अर्थबोधक शब्द आला, तर त्याच्या मागें व पुढें **स्वल्पविराम** द्यावा. जसें–मराठ्यांचा पुरस्कर्ता, शिवाजी, यानें औरंगजेबाचा पराभव केला.

( फ ) कोणतेंही संबंधीं सर्वनाम किंवा ‘ जर ’ हें अव्यय एखाद्या मोठ्या वाक्याच्या आरंभीं आलें, तर

त्याचे प्रतिसंबंधी जें, पुरुषवाचक सर्वनाम, दर्शक सर्वनाम किंवा 'तर' हें अव्यय, त्यांच्या पूर्वी **स्वल्पविराम** दिला पाहिजे. जसें-जर तुमचें खटलें न्यायाधीशाकडे न्यावयाचें आहे, तर तें त्या गणपतराव वकिलाच्याद्वारें न्या. जसा तो चांगल्या रीतीनें काम करील, तसा दुसरा कोणीं करणार नाहीं.

( ह ) लांबलचक वाक्य असून जर त्यामध्यें वर्तमान-भूत-पूर्व-कालवाचक, किंवा विधिवाचक धातुसाधितें आलीं, तर त्यापुढें **स्वल्पविराम** द्यावा. जसें-बाजीराव उत्तर हिंदुस्थानांत स्वारीस जात असतां, निजामानें आपलें सैन्य बरोबर घेऊन, तो अगदीं बेसावध असतां, त्याच्या लष्करावर एकाएकीं छापा घातला.

( ल ) 'कीं' हें अव्यय वाक्यांत असतां त्याच्या मागें अथवा पुढें **स्वल्पविराम** देणें तो बहुतकरून कानास गोड लागेसा, व अर्थास विरोध न येई असा द्यावा. जसें-रामानें सांगितलें कीं, आतां जर तुह्मी मला छळिलें, तर मी फिर्याद करीन. त्या वाक्याचा अर्थ असा केला, कीं तो कोणालाही समजणार नाहीं.

( म ) लोकांच्या ह्मणण्याचा उद्देश किंवा ह्मणणें जर वाक्यांत आणावयाचें असल, तर ह्मणण्याच्या पूर्वी व शेवटीं **स्वल्पविराम** द्यावा. जसें-तो ह्मणतो, मी त्याकडे येत नाहीं. तूंच जा. बाजीराव ह्मणाले, मी आपणांस शरण येतों, मग मला मारा अगर सोडून द्या.

९ जेव्हां एखाद्या लांबलचक व पूर्ण वाक्याचे वाक्यरूपानें अगर तुटक वाक्यरूपानें भाग पाडतात, तेथें

एखाद्या योग्य अर्थाचें उल्लेखन करण्यास किंवा सांगितलेल्या अर्थास जोर आणण्याकरितां उदाहरणादाखल दुसरें वाक्य घालावें लागतें, तेव्हां अशा वाक्याच्या पूर्वी **अपूर्णविराम** द्यावा. जसें—सर्व देशांत साधु पुरुष गेले; ते असेंच ह्मणतात, व आपणही नित्य पाहतों: येथील सुख क्षणिक आहे, ह्मणून आपण त्या सुखासाठीं लोभांत पडून पाप करूं नये.

६ जेव्हां एखादें मोठें वाक्य संपतें, व नंतर दुसऱ्या वाक्यास आरंभ होतो, अथवा एखाद्या मोठ्या वाक्यांत एक अर्थ मुख्य मानून, त्याचे सोयस्कर भाग पाडून ते त्या वाक्याशीं जोडावयाचे असतात, तेव्हां हीं जीं तुटक वाक्यें असतील, त्यांपुढें **अर्धविराम** द्यावा. जसें—सर्व लोकांनीं राजास देवाप्रमाणें मानिलें पाहिजे; नुसतें द्रव्यदान करून, राजाचा मान ठेविला असें होत नाहीं.

७ ज्या शब्दांत किंवा वाक्यांत हर्ष, शोक, विस्मय, धिक्कारादि मनोविकारांचें उल्लेखन असतें, त्या शब्दांपुढें किंवा वाक्यांतीं **उद्गारचिन्ह** लिहावें. जसें—अहाहा ! काय मौज ही !

८ ज्या वाक्यांत प्रश्न करावयाचा, तें वाक्य जेथें संपतें तेथें **प्रश्नचिन्ह** लिहावें. जसें—तूं कोण आहेस ?

९ वाक्यांत अगर ग्रंथांत अथवा कोठेंही लिहितांना, वाक्य, ह्मण अगर वेंचा घालावयाचा असतां, तें वाक्य अथवा तो वेंचा " " या चिन्हांत लिहावा. जसें—रामदास ह्मणतात "जगीं सर्व सूखी असा कोण आहे?"

तसेंच तुकाराम ह्मणतात " आलिया भोगासि असावें सादर "

१० एखाद्या पूर्ण वाक्यांत शब्दांचा अनुक्रम योग्य चालत असतां, लिहिणारास मध्येंच कांहीं नवें सुचलें व तें तेथें लिहिणें बरोबर नसलें, अथवा त्यांत तें नीट जुळत नसलें, तर तें तेथेंच **कौंसांत** घालितात. जसें—मला माझ्या मित्रानें ( वासुदेवानें ) खेळांतील खुबी सांगितली आहे.

११ एका शब्दांतील कांहीं अक्षरें पहिल्या ओळींत लिहून, ती ओळ संपल्यामुळें बाकीचीं अक्षरें पुढच्या ओळीस जोडावयाचीं असतां **संयोगचिन्ह** करितात. एकाद्या मोठ्या वाक्यांत मध्येंच एखादें तुटक वाक्य घालावयाचें, अगर त्याचा अर्थ करून दाखवावयाचा असतां, त्या दोन्ही शब्दांमध्यें अगर वाक्यांमध्यें हें चिन्ह घालावें. जसें—मी तुला शालोपयोगी जिन्नस—पुस्तकें वगैरे देईन—पुरवीन.

# अभिप्राय.

**मराठी शुद्धलेखनाचे निवडक नियम** हें लहानसें पुस्तक समग्र वाचून पाहिलें. या पुस्तकांतील पांचही भागांवरून हें पुस्तक लहानथोर सर्व विद्यार्थ्यांस फारच उपयोगी पडेल; विद्यार्थ्यांसच काय पण प्रत्येक मराठी लेखकास याचा चांगलाच उपयोग होईल असें वाटतें.

( सही ) **बाळ परशुराम पंडित.**
माजी डे० ए० इन्स्पेक्टर इ० करवीर.

---

**शुद्ध लिहिण्याचे निवडक नियम** हें पुस्तक साग्र वाचून पाहिलें. पुस्तकाच्या आरंभीं व्याकरणाचे साधारण नियम दिले असून पुढें अनुस्वार, र्‍हस्वदीर्घ. लेखनपद्धति, व विरामचिन्हें यांसंबंधीं नियम सांगितले आहेत. ते फार सुबोध असून लहान थोर विद्यार्थ्यांस व विशेषेंकरून ज्यांची स्वभाषा मराठी नाहीं अशा लोकांना मराठी शुद्ध लिहिण्याचे कामीं फारच उपयोगी पडण्यासारखे आहेत. या पुस्तकांत माहिती बरीच दिली असून त्याची किंमत फार कमी आहे.

३-२-९५ ( सही ) **रामचंद्र अणाजी सावनूर**
डे० ए० इन्स्पेक्टर, बेळगांव.

---

सदर पुस्तकाचे संबंधानें मे० रावसाहेब सावनूर डे० ए० इन्स्पेक्टर बेळगांव यांचा जसा अभिप्राय आहे तसाच माझाही आहे.

| | |
|---|---|
| कोल्हापूर | बळवंत लक्ष्मण वैद्य |
| ता० २६।१२।९९. | हेडमास्तर ट्रेनिंग स्कूल |

---

**वार्ताहर**—प्रस्तुत पुस्तकाचे पांच भाग केले आहेत ते असेः—व्याकरण, अनुस्वार, ऱ्हस्वदीर्घ, लेखनपद्धति व विरामचिन्हें. प्रत्येक भागांतील नियमांच्या व्याख्या अगदीं सोप्या भाषेंत लिहिल्या असल्या कारणानें, सदहू पुस्तक गव्हर्मेंट मराठी शाळांत सुरू केल्यास, त्याचा उपयोग मुलांना चांगला होऊन पुस्तककर्त्याच्या श्रमाचें चीज होईल असें आह्मांस वाटतें. पुस्तकाची छपाई चांगली आहे.

**राजहंस**—शुद्ध लेखनासंबंधीं नियम या चिमुकल्या पुस्तकांत अत्यंत सुलभ रीतीनें समजण्याजोगे दिले आहेत. हें पुस्तक संग्रहास योग्य आहे. पुस्तकांतील भाषा व विषयविवेचन हीं उत्कृष्ट आहेत. मराठी जाणणारां जवळ हें पुस्तक असणें अवश्य आहे.

**बालबोध**—चांगलें आहे. लहान विद्यार्थ्यांच्या उपयोगी आहे.


**महाराष्ट्रकोकिळ**—पुस्तक उपयुक्त व संग्राह्य आहे,

**विक्षिप्त**—....नियम थोडक्यांत सांगितले आहेत ते बरे आहेत.....मराठी शुद्ध लेखनासंबंधीं हें छोटेंसेंच कां होईना, परंतु फार महत्वाचें पुस्तक होईल अशी आशा आहे.

**विद्याविलास**—यांत शुद्ध लिहिण्याला बरीच मदत होईल असें विवरण केलें आहे.

**चिकित्सक**—सदरहु पुस्तकांत शुद्ध लेखनाचे नियम थोडक्यांत दिले आहेत. दादोबाचें मोठें व्याकरण घेण्याचें ज्यांस सामर्थ्य नाहीं, त्यांनीं हें पुस्तक संग्रहीं ठेविलें असतां व्याकरणांतील तेवढा भाग त्यांस चांगला समजणार आहे. भाषा बरी आहे.

**शुभसूचक**—सदर्हु पुस्तकाची ही पहिली आवृत्ति होईल तितकी थोडक्यांत उपयुक्त करण्याची खटपट कर्त्यांनीं केली आहे. व तीस यशही बरेंच आलें आहे. या पुस्तकाचा मराठी भाषेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांस शुद्ध लिहिण्याचे कामीं चांगला उपयोग होईल.



# प्रस्तावना

शुद्धलेखनाची योग्यता केवढी मोठी!! आणि लोकांचें तिकडे दुर्लक्ष!! शिवाय योग्य असें पुस्तक झालेलें नाहीं. कांहीं आहेत तीं अवघड. ह्मणून हें पुस्तक मुद्दाम तयार केलें आहे. अनुभवसिद्ध आहे. आधार अनेक व्याकरणांचा आहे. थोडक्या नियमांत पुष्कळ माहिती. पाल्हाळास संक्षेपच!!

ही आवृत्ति दुसरी. या आवृत्तींत पुष्कळ सुधारणा केली आहे. ताडून पाहिल्यास समजेलच. रा. रा. विक्षिप्तकर्ते यांनीं दाखविलेले दोष काढून टाकिले आहेत. व त्यांनीं केलेल्या सूचनांचा सादर स्वीकार केला आहे. मी त्यांचा ऋणी आहें.

मागील प्रमाणें याही आवृत्तीस भरपूर आश्रय मिळावा. ह्मणजे उपकार होतील; व याहीपेक्षां सुधारणा करितां येतील. दोष दाखविल्यास उपकार होतील. पुढील आवृत्तींत अवश्य सुधारीन.

चिकोडी. }
ता० १ जून १८९६ इ. } पुस्तककर्ता.

M13652